# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 25/01/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. खापा :– दिनांक 23/01/2021 चे 21.45 वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पो. स्टे. खापा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना एमच–34/एबी–4711 क्रमांकाचा 10 चक्का ट्रकचा चालक आरोपी क्र– 1) अर्जुन सावजी काटमेघे, वय 52 वर्ष, रा. इंदीरामाता नगर झोपडपट्टी मानकापूर, नागपूर याने त्याचा ट्रकचा मालक आरोपी क्र. 2 च्या सांगण्यावरून त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 20,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 10,20,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे सफौ बाबा केचे स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री झांबरे 9028748409 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा देवऋषी कंपनी समोर येथे दिनांक 24/01/2021 चे 11:30 वा. दरम्यान अज्ञात वाहन चालक आरापीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन 14 मैल ते कळमेश्वर कडे जाणाऱ्या रोडच्या बाजुला असलेली देवऋषी कंपनी समोर रोडच्या कडेला उभा असलेला सुदाम साहेब सिंग राजपुत (मृतक), वय 62 वर्ष, रा पंचमुसाहफर खदान निमजी यास धडक मारून जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत ठरला व अज्ञात वाहन चा चालक हा अपघात करून वाहन घेवुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अजय इंद्रदेव वर्मा, वय 42 वर्ष, रा. पन्नासे लेआवुट 14 मैल त. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा श्री चंद्रशेखर सावध पो स्टे कळमेश्वर मो न 9511653523 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा खापा टाउन येथे दिनांक 24/01/2021 चे 17:15 वा. दरम्यान नामे– संजय अमरलाल सेलु(मृतक), वय 27 वर्ष, रा. जुनी वस्ती खापा हा एमएच–40/एल–9461 क्रमांकाच्या ट्रैक्टरवर वर जात असतांना ट्रैक्टर चालक आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रैक्टर भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालविल्यामुळे ट्रैक्टर मध्ये बसलेला मृतक हा ट्रैक्टर वरून खाली पडला. या अपघातात संजय सेलु हा गंभीर जखमी होवून घटनास्थळीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ईश्वर सेवकराम धुर्वे, वय 25 वर्ष, रा. खापा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि झांबरे पो.स्टे खापा मो क 9028748409 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर